शिक्षणाधिकारी, गट-अ, महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) मधील अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार कार्यवाहीबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन आदेश क्रमांकः बदली ३११९/प्र.क्र.४३/प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २३ ऑगस्ट, २०१९

वाचा:- १. शा.शि.व क्री.वि., शासन निर्णय.क्र.ईएसटी-३९१७/प्र.क्र.४६/प्रशा-२, दिनांक १७/०३/२०१७
२. शा.शि.व क्री.वि., शासन आदेश क्र. बदली ३११९/प्र.क्र.४३/प्रशा-२, दिनांक ४/०६/२०१९
३. शा.शि.व क्री.वि., शासन आदेश क्र. बदली ३११९/प्र.क्र.४३/प्रशा-२, दिनांक २६/०७/२०१९
४. मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांचे मूळ अर्ज क्र.७३६/२०१९ मधील दिनांक २९/७/२०१९ रोजीचे अंतरिम आदेश
५. शा.शि.व क्री.वि., शासन आदेश क्र. बदली ३११९/प्र.क्र.४३/प्रशा-२, दिनांक ३०/०७/२०१९
६. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे रिट पिटीशन (स्टॅम्प) क्रमांक २१८०८/२०१९ मधील दिनांक २/०८/२०१९ रोजीचे आदेश.

शासन आदेश-

मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मूळ अर्ज क्रमांक ७३६/२०१९ प्रकरणी दिनांक २९.०७.२०१९ रोजी सुनावणी होऊन मा. न्यायाधिकरणाने श्री. शेषराव बडे यांना त्यांच्या पदावर फेर नियुक्ती (repost) करण्याबाबत अंतरिम आदेश पारित केले आहेत. त्या अनुषंगाने श्री. बडे यांचे दिनांक ३०.०७.२०१९ रोजीच्या आदेशान्वये शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. ठाणे या पदावर फेरनियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर आदेशाविरूध्द श्रीमती मीना शेंडकर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.२१८०८ दाखल केले असून, सदर रिट पिटीशन मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २.०८.२०१९ रोजीच्या आदेशान्वये श्रीमती शेंडकर यांची शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण), जि.प. ठाणे या पदावर तात्पुरती व्यवस्था म्हणून पदस्थापना देण्यात यावी, असे आदेश पारित करून रिट पिटीशन निकाली काढले आहे.

२. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे सदर आदेश विचारात घेता, शासनाने दिनांक ३०.०७.२०१९ रोजीच्या आदेशान्वये निर्गमित केलेले श्रीमती मीना शेंडकर यांचे शिक्षणाधिकारी, म.न.पा. बृहन्मुंबई येथील बदलीचे आदेश तात्पुरते रद्द करण्यात येत असून, श्रीमती शेंडकर यांची मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशाप्रमाणे शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण), जि.प. ठाणे या पदावर तात्पुरत्या स्वरूपात

बदली करण्यात येत आहे. सदर बदली आदेश मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मूळ अर्ज क्रमांक ७३६/२०१९ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

३. श्रीमती मीना शेंडकर यांनी शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण), जि.प. ठाणे या पदाचा पदभार त्वरित स्विकारावा तसेच त्यांनी अनधिकृत रजेवर जाऊ नये.

४. आयुक्त (शिक्षण) पुणे यांनी या आदेशाप्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्याबाबत संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांना तातडीने कळवावे व श्रीमती मीना शेंडकर ह्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ रुजू होतील, याची खातरजमा करावी व याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२३१३२७२५२६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Santosh Basaveshwar Mamadapure

Digitally signed by Santosh Basaveshwar Mamadapure
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3bfe111652996d95372924b1d22cdf88b33dfa2a3de3d8ea011b7d83adc40cb6, serialNumber=557abe7a7194ec5ddc74df537d7d57a9dbda20b1937a2e41983c35f6a38b6ad8, cn=Santosh Basaveshwar Mamadapure
Date: 2019.08.23 13:38:06 +05'30'

(संतोष ममदापुरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई
२. आयुक्त, शिक्षण आयुक्तालय (मध्यवर्ती इमारत),महाराष्ट्र राज्य, पुणे
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे, जि. ठाणे
४. सर्व शिक्षण संचालक
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
८. संबंधित अधिकारी (आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालयामार्फत)

प्रत माहितीसाठी,

१. मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी.
२. अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक
३. निवडनस्ती, प्रशा-२.